कार्यवाह
शांताराम पंदेरे
चव्हाण निवास
खोकडपुरा
औरंगाबाद ४३१ ००१

सहकार्यवाह
मधु मोहिते
पोतदार बिल्डिंग
शास्त्रीनगर कळवा,
जि. ठाणे ४०० ६०५

मध्यवर्ती कार्यालय
द्वारा : अजित सरदार
राही चेंबर्स,
२० सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०
फोन : ५८८०९

युक्रांद

# युवक क्रांती दल, महाराष्ट्र

जावक क्र. ॥ कृपया प्रसिध्दीसाठी ॥ दिनांक ३ मे १९८९

'मक्तेबाज भांडवलदार आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या अमानुष शोषणाला मार्ग खुला करून, आणि जातीयवादी-धर्मांध शक्तींना प्रोत्साहन देऊन सत्ताधारी कॉंग्रेस पक्ष आणि त्याचे सर्वेसर्वा पंतप्रधान राजीव गांधी संसदीय लोकशाहीचा गाभा उध्वस्त करीत आहेत. या देशातील सर्वसामान्य कष्टकरी जनतेचे प्रश्न सोडवण्यात त्यांना पूर्णपणे अपयश आलेले आहे. या पार्श्वभूमीवर डाव्या व लोकशाहीवादी पक्षांनी निश्चित तत्त्वविचार व ठोस कार्यक्रम यांच्या आधारे एकजूट करून कॉंग्रेस (आय) चा पाडाव करावा असे आवाहन युवक क्रांती दलाने केले आहे.

पुणे येथे सुरू असलेले युक्रांदचे १४ वे राज्यव्यापी कार्यकर्ता शिबीर काल दि. २ मे '८९ रोजी समाप्त झाले. या शिबिरात सद्य राजकीय परिस्थितीवर चर्चा करण्यात आली. कॉंग्रेसच्या ४० वर्षांच्या लोकविरोधी धोरणाचा परिणाम म्हणून आज देशभर कॉंग्रेसविरोधी असंतोष खदखदतो आहे. विविध राज्यांतील कॉंग्रेसेतर सरकारे हे त्याचेच लक्षण आहे. परंतु केवळ केंद्रीय सत्तेवरून राजीव गांधी हटाव चा कार्यक्रम घेऊन पर्यायी राजनीती देता येईल असे वाटत नाही. सध्या विविध पक्षांचे राजीनामे हा फक्त प्रसिध्दीचा उपचार राहिला आहे. सत्ताधारी राजकीय पक्षाला खाली खेचण्याचाच मुख्य कार्यक्रम असतो. आम जनतेच्या मूलभूत प्रश्नांची व त्यावरील उपायांची चर्चा देशातील डावे आणि लोकशाहीवादी पक्ष फारसे करू शकलेले नाहीत. त्यामुळे त्यांची एकजूट होण्यामध्ये आणि जनतेचा कॉंग्रेसविरोधी असंतोष संघटित करण्यात त्यांना फारसे यश आलेले नाही. परंतु ठोस पर्यायी राजनीती आणि कार्यक्रमावर आधारित एकजूट करून डाव्या-लोकशाहीवाद्यांनी पर्याय निर्माण केल्यास युक्रांदचा त्याला पाठिंबा राहील.

वरील राजकीय निवेदनाच्या जोडीला, जमीन-पाणी-गावठाणाचे हक्क मान्य करा; नवे लोकविरोधी वनधोरण आणि वनजमिनीचे खाजगीकरण-व्यापारीकरण हाणून पाडा; जातीयवादी-धर्मांध शक्तींविरोधी संघर्ष करा; या मागण्यांसाठी तसेच नवे शैक्षणिक धोरण, महागाई टंचाई, औद्योगिक टंचाई, रोजगार हमी योजना, महिला चळवळ, भटक्या-विमुक्तांची चळवळ, राखीव जागा इ. विषयक ठराव या शिबिरात मंजूर करण्यात आले. या ठरावांच्या अनुषंगाने, पुढील वर्षासाठी काही कार्यक्रम निश्चित करण्यात आले. कॉंग्रेसच्या राजकीय-आर्थिक धोरणाचा एक भाग म्हणून नवे शैक्षणिक धोरण या वर्षापासून सुरू होत आहे. त्यानुसार सुरू होणाऱ्या जिल्हास्तरावरील नवोदय शाळा (मॉडेल स्कूल्स) ही चालुवण्याची नवी आवृत्ती आहे. विषमतेला बळकटी आणणाऱ्या आणि देशातील गरीब व मागासवर्गीयांना शिक्षणाच्या आणि विकासाच्या संधीपासून आणखी दूर नेणाऱ्या, नवोदय शाळा येत्या शैक्षणिक

कार्यवाह
शांताराम पंदेरे
चव्हाण निवास
खोकडपुरा
औरंगाबाद ४३१ ००१

सहकार्यवाह
मधु मोहिते
पोतदार बिल्डिंग
शास्त्रीनगर कळवा,
जि. ठाणे ४०० ६०५

मध्यवर्ती कार्यालय
द्वारा : अजित सरदार
राही चेंबर्स,
२० सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०
फोन : ५८८०९

युक्रांद

# युवक क्रांती दल, महाराष्ट्र

जावक क्र.  दिनांक

वर्षापासून सुरू होणाऱ्या कष्टकरी शेतकरी, भूमिहीन, दलित, आदिवासी, कामगार, भटके-विमुक्त यांना बरोबर घेऊन बंद पाडण्यात येतील असा निर्णय युक्रांदने घेतला आहे.

युक्रांदच्या स्थापनेला वीस वर्षे झाली आहेत. या कालखंडाचा आढावा घेऊन 'सद्य राजकीय परिस्थितीत संसदबाह्य परिवर्तनवादी शक्ती- चळवळीचे स्थान' राज्य व देशपातळीवर विचारमंथन घडवून आणण्याचा संकल्प या शिबिरात करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी व म. फुले मृत्युशताब्दीनिमित्त १९८९-९० व ९०-९१ ही प्रबोधनवर्षे म्हणून साजरी करण्यात येतील. त्याचबरोबर राखीव जागा, मंडल आयोग, जमीन- पाणी इ. महत्त्वाच्या प्रश्नांवर परिषदा घेण्यात येतील.

पुढील शिबिरापर्यंत युक्रांदची नवी राज्य कार्यकारिणी निवडण्यात आली. कार्यवाह म्हणून शांताराम पंदेरे (औरंगाबाद), सहकार्यवाह श्री. मधु मोहिते (मुंबई) व खजिनदार वसुधा सरदार (पुणे) यांची एकमताने निवड करण्यात आली. अजित सरदार, शांताराम गोपाळे, गंगाधर त्रिभुवन, उत्तम आवाड, ~~रामप्रसाद~~ यशवंत पवार, निर्मला स्वामी व सुनील पाटील यांचा कार्यकारिणीत समावेश आहे.

---

क्रांतिकारक अभिवादन.

कृपया वरील निवेदनास आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्दी द्यावी ही विनंती.

आपला

शांताराम पंदेरे.